सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र.बार्टी/पुणे/ MPSC/२०२४-२५/४७३ दिनांक : २०/०१/२०२५

# सूचनापत्रक (MPSC- राज्यसेवा स्पर्धा परीक्षांकरिता)

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा (State Service) स्पर्धा परीक्षांकरिता, परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५ करिता, १२०० प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्याची निवड करण्याकरिता दि. १२,१३ व १४ ऑगस्ट २०२४ रोजी सामायिक चाळणी परीक्षा (CET) घेण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार विद्यार्थ्यांना प्राप्त Percentile Score, आरक्षणानुसार दिनांक २१ सप्टेंबर,२०२४ रोजी प्रथम तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली व रिक्त जागांच्या अनुषंगाने दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी दुसरी तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या दुसऱ्या तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी मधील नमूद विद्यार्थ्यांना दिनांक २० जानेवारी, २०२५ पर्यंत ऑनलाईन पोर्टल च्या मार्फत प्रशिक्षण संस्था निवड करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. तथापि तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्था निवड करणेबाबतचा ईमेल व एसएमएस पाठविता येणे शक्य नाही.

तरी दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजीच्या तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी मधील नमूद विद्यार्थीनी ऑनलाईन पोर्टल ला भेट देऊन **लॉगीन व पासवर्ड चा वापर** करून आपल्या पसंतीची प्रशिक्षणाचे ठिकाण व प्रशिक्षण संस्थेची निवड करावी. याकरिता **दिनांक २२ जानेवारी, २०२५ पर्यंत मुदतवाढ** देण्यात येत आहे. तदनंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्रशिक्षणाच्या पुढील कार्यवाहीबाबत बार्टी, पुणे संकेतस्थळावर वेळोवेळी सूचना प्रसिद्ध करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी बार्टी संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देणे अनिवार्य आहे.

स्वाक्षरी....
(सुनिल वारे)
**महासंचालक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था बार्टी,पुणे.**